# ग्रीनलॉन्स विदयालय

## TERMINAL EXAMINATION -2024

**दिनांक - ३-१०-२०२४** **मराठी** **वेळ -२ तास**

**इयत्ता - ८वी-अ,ब,क** **मार्क ८०**

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and Section B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet.**

**विभाग "अ"** **४० मार्क**

प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [३]

१. तहानभूक ------------------- आम्ही दगडावरची चित्रं रंगवत बसायचो.

( हरवून, हरपून, हलवून)

२. म्हणजे मग त्या पोटोबाला चांगलीच ----------------------घडेल.

(शक्कल, अक्कल, अद्दल)

३. जो उठतो तो,कशासाठी?म्हणत आम्हांला ------------------------- घेतो.

(बजावून, राबवून, दामटवून)

प्रश्न २. कोण - कोणास म्हणाले ते लिहा. **(कोणतेही २)** [२]

१. "मी घास उचलणार नाही."

२. तुझ्यापेक्षा माझा उपयोग जास्त महत्त्वाचा आहे बरं का."

३. "मी केव्हाच हजर आहे महाराज."

प्रश्न ३अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. सज्जनांशी कसे वागले पाहिजे?

२. जिव्हाताईने कोणती तक्रार केली?

३. कवीने वर्णिलेली प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे?

प्रश्न ३ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ३)** [६]

१. प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

२. पदकुमार आणि हस्तराज यांनी काय निश्चय केला?

३. शिष्याने गुरूला कोणत्या उपमा दिल्या आहेत?

४. जिव्हाताईची कामे कोणती?

प्रश्न ४ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. [८]

वैशाख महिन्यातील ऊन करपवून टाकणार असायचं. आम्ही गावातली सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडायचो. अंगात गारवा भरला, की पुन्हा काठावर येऊन बसायचं. काठालगत खूप खडक होते. पाण्याच्या प्रवाहामुळं गुळगुळीत, सपाट झालेले, लांबरुंद पसरलेले. आम्हाला तिथंच आमचा 'कॅनव्हान्स' सापडला. या भल्या थोरल्या खडकावर मनसोक्त चित्र काढता येणार होती; पण कशानं काढणार? तोही मार्ग सापडला.

आमच्या त्या भागात तांबूस रंगाचा मुरूम असतो. शिवाय पिवळट रंगाचे दगडही सापडतात. ते दगड आपटले, की त्याची पिवळी पिवळी फक्की पडते. अगदी पिठासारखी असते. हवं तसं पाणी घातलं, की पिवळा रंग तयार! मुरुमाचा खडा ओला करून घेतला आणि खडकावर चित्र रेखाटणं सुरु झालं. काय काढू आणि काय नको असं व्हायचं. गुडघ्यावर टेकून रेष काढण्यात दंग व्हायचो. रेषा काढीत हातभार पुढं सरकल्यावर मागे वळून पाहावं, तर रेषा वाळून लालजर्द झालेल्या असायच्या. आणखी सुरसुरी यायची. तापलेल्या खडकावर टेकून टेकून गुडघ्याची सालट गेलेली लक्षातच यायची नाहीत. मग उभ्या खडकावर चित्र काढणं सुरु झालं.

काही दिवसांनी वाटायला लागलं, की यात रंग भरावेत; पण ते कुठून आणणार? त्या दिवसात काटेसावर फुलते, लालभडक होते. तिच्या फुलातले पराग पाण्यात चुरगाळले, की जांभळा रंग मिळतो. शेंदरी नावाच्या वनस्पतीच्या बोडातल्या बिया भगवा रंग देतात. काही पानांचा हिरवा केला. चुन्याचा पांढरा, कुंकवाचा लाल आणि दगडाचा पिवळा होताच. बांबूची कोवळी काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा. नजर जाईल तिथपर्यंत चित्रच चित्रं. थोड्या दिवसांनी पाऊस यायचा. नदी वाहायला लागायची. आमची चित्रं नदीच्या पोटात गडप व्हायची.

प्रश्न :-

**कृती १** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. लेखकाला जांभळा रंग कसा मिळतो? [१]

२. गावातील सर्व मुले कोठे जाऊन पडायची? [१]

३. रेषा काढीत हातभर पुढं सरकल्यावर मागे वळून पाहिल्यावर काय दिसायचे? [१]

**कृती २** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. लेखकाने रंग कसे मिळवले?

**कृती ३** रिकाम्या जागा भरा. [१]

अ) तापलेल्या खडकावर टेकून टेकून -------------------- सालट गेलेली लक्षातच यायची नाहीत.

ब) आमची चित्रं नदीच्या पोटात ------------------ व्हायची.

**कृती ४** चौकटीतून योग्य समानार्थी शब्द निवडून लिहा. [१]

(मार्ग,  गडप,  मुरूम)

अ) वाट- --------------------------   ब)गायब - ------------------------------

**कृती ५** चौकटीतून योग्य विरुद्धार्थी शब्द निवडून लिहा. [१]

(हरवणे,  मिळवणे,  ऊन)

अ) सावली X ----------------------   ब) सापडणे X ---------------------------

प्रश्न ५ अ) खालीलपैकी कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर पत्र लिहा. [५]

१. तुमच्या शाळेत उन्हाळी सुट्टीत (summer vacation)'हस्ताक्षर सुंदर करूया!' (improvement in handwriting)हे दहा दिवसांचे शिबीर (camp) आयोजित केले आहे. त्यात तुम्हाला सहभागी (participant) करून घेण्याची विनंती करणारे पत्र तुमच्या वर्गशिक्षकाला लिहा.

**OR**

२. मित्राला (friend) बहिणीच्या वाढदिवसाचे निमंत्रण (invitation) करणारे पत्र तुमच्या मित्र/मैत्रिणीला लिहा.

प्रश्न ५ ब)खालीलपैकी कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर निबंध लिहा. [६]

१. माझा आवडता छंद -

**मुददे -** कोणता छंद - कसा लागला- मदत कोणाची- का आवडतो.

२. माझा आवडता सण

**मुददे -** सणाचे नाव- कोणत्या महिन्यात येतो-कसा साजरा केला जातो- तुम्ही काय

३. झाड आपले मित्र

**मुददे -** झाडांचा उपयोग- झाडांना कसे जपले पाहिजे - मित्र का आहे

४. राष्ट्रपिता - गांधीजी

मुददे - संपूर्ण नाव - जन्म - शिक्षण - विदेश प्रवास - कार्य - शिकवण

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. [७]

रामपूर गावात जयराम नावाचा एक भिकारी राहत होता. तो भीक मागून स्वतःचे व कुटुंबाचे पोट भरत असे. एक दिवस त्याला काही भीक मिळाली नाही. तो देवाला म्हणाला,"देवा,तू दयाळू आहेस,मग का मला काही देत नाही?" देवाला त्याची दया आली. देव प्रकट झाला.

देव जयरामाला म्हणाला,"मी तुला आज सोन्याच्या मोहरा देणार आहे" हे ऐकताच जयराम खूप आनंदी झाला. तो देवाला म्हणाला,"मोहरा मिळताच माझे दारिद्रय जाईल. माझी बायको मुले सुखाने राहतील"पण देवाने जयरामाला एक अट घातली,की "तू थांब म्हणेपर्यंत मी तुला मोहरा देईन पण घेताना त्या जर जमिनीवर पडल्या तर त्यांची माती होईल." भिकारी अट मान्य करतो.

भिकारी मोहरा झोळीत घेतो. झोळी भरत आली तरी तो देवाला सांगत नाही मोहरांच्या वजनाने झोळी फाटते व सर्व मोहरा जमिनीवर पडतात. भिकारी त्या मोहरा उचलू लागतो पण त्याच्या हातात माती येते व देवही अदृश्य होतो. भिकाऱ्याला आपली चूक कळते. तो स्वतःशीच म्हणतो "अरेरे! अति हावरेपणामुळे माझा हाती मातीच आली..

प्रश्न

**कृती १** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [१]

१. भिकारी मोहरा कशात घेतो?

२. देवाने त्याला कोणती अट घातली? [१]

३. भिकारी आपले व कुटुंबाचे पोट कसे भरत असे? [१]

**कृती २** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. भिकाऱ्याचे नाव काय होते तो कोठे राहत होता?

**कृती ३** रिकाम्या जागा भरा. [१]

१. अति -----------------------माझा हाती मातीच आली.

२. मोहरांच्या वजनाने --------------------- फाटते.

**कृती ४** चौकटीतून योग्य विरुद्धार्थी शब्द निवडून लिहा. [१]

(आनंद, हसरा, दारिद्रय)

१. श्रीमंती x -------------------------    २. दुःख x -----------------------------

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

**नाव -** ------------------------------------------------------- **हजेरी क्र.**---------------- **इयत्ता – ८वी अ,ब,क**

**विभाग -ब** **मार्क ४०**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहा. **(कोणतेही ५)** [५]

१. फरफट होणे - ---------------------------------------------------------------------------------------------

२. दुथडी भरून वाहणे - ----------------------------------------------------------------------------------------

३. कुरकुर करणे - --------------------------------------------------------------------------------------------

४. हिरमोड होणे - --------------------------------------------------------------------------------------------

५. तहानभूक हरपणे - -----------------------------------------------------------------------------------------

६. क्षमा करणे - ----------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न २अ] खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. कडुलिंबाची पाने चवीला कडू असतात.

उत्तर - नाम - ------------------------------- नामाचा प्रकार - ---------------------------------------------

२. गावात बरीच प्रकारची झाडे बघायला मिळतात.

उत्तर - नाम - -------------------------------- नामाचा प्रकार - ---------------------------------------------

३. आज हवेमध्ये गारवा आहे.

उत्तर - नाम - -------------------------------- नामाचा प्रकार - ----------------------------------------------

प्रश्न २ब] खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [३]

१. आम्हांला कामात मदत करा. उत्तर – सर्वनाम - ------------------------------------------------------

२. पण हा कोण आला इकडे? उत्तर – सर्वनाम - ----------------------------------------------------------

३. ज्याला खाऊ हवा असेल, त्याला अभ्यास करावा लागेल. उत्तर – सर्वनाम - --------------------

प्रश्न २क]खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. नदीने रौद्र रूप धारण केले होते.

उत्तर - विशेषण - ------------------------- प्रकार - -------------------------------------------------------

२. पाण्याच्या बाटलीची किंमत दोनशे रुपये सांगितली.

उत्तर - विशेषण - ------------------------- प्रकार - --------------------------------------------------------

३. ते दृश्य खूप भयानक होते.

उत्तर - विशेषण - -------------------------- प्रकार - ---------------------------------------------------------------

प्रश्न ३अ] खालील चौकटीतून योग्य समानार्थी शब्द निवडून लिहा. [३]

(लक्ष्य, अखंड, आकाश, भेट, फिरणे, प्रगत, निष्ठा)

१. नजराणा - ------------------------- २. अभंग- ----------------------------------

३. वेध - -------------------------------- ४. उन्नत - -----------------------------------

५. नभ - -------------------------------- ६. फिरस्ती - -------------------------------

प्रश्न २ ब] खालील चौकटीतून योग्य विरुद्धार्थी शब्द निवडून लिहा. [३]

(सोपे, गौण, सार्वजनिक, तरुण, भित्रा, रसपूर्ण, अपमान)

१. अवघड X --------------------------- २. कौटुंबिक X ------------------------------

३. धैर्यशील X ------------------------------ ४. सन्मान X ----------------------------------

५. प्रमुख X ------------------------------ ६. वयस्कर X ---------------------------------

प्रश्न ३क] खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. सुरेशने गरिबाला भाकरी दिली.

उत्तर - ------------------------------------------------------------------------------------------------------------------

२. अंगठीतला हिरा चमकत होता.

उत्तर - ------------------------------------------------------------------------------------------------------------------

३. देवीला फुलांची वेणी घालतात.

उत्तर - ------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ३ड] खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. घराचे साहेब खूप चांगले आहेत.

उत्तर - ------------------------------------------------------------------------------------------------------------------

२. जो गाणे गाईल तो शहाणा.

उत्तर - ------------------------------------------------------------------------------------------------------------------

३. पाऊस आल्यावर लांडोर नाचते.

उत्तर - ----------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ४. खालील शब्दांचे अर्थ लिहा. [६]

१. अमूल्य - ------------------------------------ २. शासन - ----------------------------------

३. कसूर- --------------------------------------- ४.बेअदबी - --------------------------------

५. महाशय - ---------------------------------- ६. वैताग - ----------------------------------

प्रश्न ५अ] खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [४]

१. सौदर्य,सौन्दर्य,सौदंर्य,सौंदर्य - --------------------------------------------------------------------------

२. व्यक्तिव,व्यक्तित्व,वक्तीत्वं,वैक्तित्व - --------------------------------------------------------------

३. आर्किमीडिज,आर्किमिडीज,अर्किमिडीज,आर्कीमिडीज - -------------------------------------

४. अस्तित्त्वाची,अस्तीत्वाची,अस्तितवाची,अस्तित्वाची - --------------------------------------------

प्रश्न ५ब] खालील शब्दांपासून वाक्य तयार करा. [४]

१. डोळे (eyes) - ----------------------------------------------------------------------------------------------------

२. उदास (sad) - ----------------------------------------------------------------------------------------------------

३. परिश्रम (hardwork) - -----------------------------------------------------------------------------------------

४. सुवास (fragrance) - -----------------------------------------------------------------------------------------